# कुणी आभाळ लुटलं?



कुणी आभाळ लुटलं?
कसं पाणी ते आटलं?
काळ्या ढगांमध्ये कुणी
कोरं वारं हो फुकलं?

रितं आषाढाचं माथं
श्रावणात तीच गत
कधी पडेल पाऊस?
तळं खोल खोल जातं

नाही उधाण वाऱ्याला
नाही चिंब पावसाळा
पाणी पाणी होत असे
नाही चित्त हो थाऱ्याला

कधी बरसेल घन?
अंग निघेल न्हावून?
वरसाच्या बेगमीनं
तळं फुगेल पाण्यानं?

**- नरेंद्र प्रभू**

http://prabhunarendra.blogspot.com/
http://shabdshabd.blogspot.com/